# ॲग्री 'कल्चर'



# उपळाईच्या भगव्या डाळिंबला उच्चांकी दर

## प्रति कॅरेट १८०० ते २००० भाव | फळ पिकांची आवक मोठ्या प्रमाणात


सोलापूर/प्रतिनिधी

डाळिंबाचे कोठार म्हणून प्रसिद्ध असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील उपळाई, सांगोला, जत आणि मंगळवेढा तालुक्यातून आलेल्या डाळिंबला प्रति किलो ५० ते ६०, भगवा ८० ते १०० रुपये, १८०० ते २००० रुपये कॅरेट प्रमाणे भाव मिळत आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये फळ पीकाची आवक मोठ्या प्रमाणात होताना दिसून येत आहे. डाळिंब,पेरू, ड्रॅगन फ्रुट, सफरचंद व इतर स्थानिक, पर राज्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या फळांची आवक मोठ्या प्रमाणात होत आहे. व्यापारी, अडते यांच्याकडून ग्राहक आणि किरकोळ विक्रेत्यांची मोठ्या प्रमाणात मागणी केली जात आहे. सध्या भगवा डाळिंबाची बाजारामध्ये आवक वाढली आहे. हे वाण चवीला गोड, दिसायला मोठे, चमकदार दिसते आहे.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये दैनंदिन मोठ्या प्रमाणात डाळिंबसह इतर फळाची खरेदी-विक्रीतून दैनंदिन २५ ते ३० लाखो रुपयांची उलाढाल होत आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये डाळिंब, पेरू, संत्रा, मोसंबीची आवक दिवसेंदिवस वाढत असून मागणीही मोठ्या प्रमाणात होत आहे असे फळ भाजी विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

| फळ | आवक किलोमध्ये | घाऊक दर रुपयांत |
|---|---|---|
| डाळिंब | २४,७०० किलो | ५० ते ८० रुपये घाऊक |
| पेरू | ३०५० किलो | ३५-४५ रुपये किलो |
| सफरचंद | १२८० किलो | ६० ते १२० किलो |
| मोसंबी | ६००० किलो | १०० ते १२० किलो |
| चिक्कु | ७०० किलो | ६० ते ७० रुपये किलो |
| संत्रा | ५१० किलो | ११० ते १२० रुपये किलो |





सोलापूर जिल्ह्यातून आलेल्या भगव्या वाणाच्या डाळिंबास ग्राहक, किरकोळ विक्रेत्यांकडून मोठी मागणी आहे. प्रति किलो ६० पासून ते ८० रुपये भाव होलसेल दर मिळत आहे. सध्या मागणी वाढली आहे.

**-फैज बागवान**, अडते

भगवा डाळिंब दिसायला मोठा चमकदार, चविष्ठ आणि आत लाल भडक असल्याने ग्राहकाच्या पसंतीला पडत आहे. ८०-१०० प्रति किलोने भाव चालू आहे.

**-अजीज शेख**, विक्रेते

# खरिपात कांद्याच्या क्षेत्रात होणार वाढ



सोलापूर/प्रतिनिधी

यंदा मौसमी पाऊस योग्य वेळेत चांगला सुरू झाल्यामुळे खरीप हंगामातील पिकांनी जोर धरला आहे. त्यामध्ये कांद्यासह टोमॅटो आणि बटाट्याचाही समावेश आहे. कृषी मंत्रालयाने राज्य सरकारांच्या सहयोगाने केलेल्या मूल्यांकनानुसार, कांदा, टोमॅटो व बटाटा या भाज्यांच्या लागवडीखालील क्षेत्रात गेल्या वर्षीच्या तुलनेत लक्षणीय वाढ दिसून आली आहे.

यंदाच्या रब्बी हंगामात कांद्याचे उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत काहीसे कमी झाले असले तरीही देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याची उपलब्धता पुरेशी आहे. कांद्याचे पीक तीन हंगामात घेतले जाते; मार्च ते मे हा रब्बी हंगाम, सप्टेंबर ते नोव्हेंबर खरीपाचा आणि जानेवारी, फेब्रुवारी म्हणजे उशिराचा खरीप हंगाम.

पैकी रब्बी हंगामात एकूण उत्पादनाच्या ७०% कांद्याचे उत्पादन होते तर, खरीप व उशिराच्या खरीप हंगामात मिळून ३०% उत्पादन होते. रब्बी आणि खरीपाच्या सर्वोच्च उत्पादनाचा काळ यांच्या दरम्यान येणाऱ्या कमी उत्पादनाच्या महिन्यांमध्ये कांद्याचा दर स्थिर ठेवण्यात खरीपाचा कांदा महत्त्वाची भूमिका बजावतो.

या वर्षी खरीप हंगामात ३.६१ लाख हेक्टर क्षेत्र कांद्याच्या लागवडीखाली आणण्याचे उद्दीष्ट असून हे गेल्या वर्षीच्या तुलनेत २७% अधिक आहे.

कांद्याचे सर्वोच्च उत्पादन घेणारे राज्य असलेल्या कर्नाटकात १.५० लाख हेक्टर क्षेत्रावर कांद्याच्या लागवडीचे उद्दीष्ट असून त्यातील ३०% क्षेत्रावर लागवड पूर्ण झाली आहे. इतर मोठ्या कांदा उत्पादक राज्यांमध्येही लागवडीचे प्रमाण चांगले आहे.

सध्या बाजारात उपलब्ध असलेला कांदा २०२४ च्या रब्बी हंगामातील असून यंदा मार्च ते मे या कालावधीत गोळा केलेला आहे. २०२४ च्या रब्बी हंगामातील १९१ लाख टन कांदा निर्यातीवर दरमहा १ लाख टनाची मर्यादा कायम ठेवल्यास देशांतर्गत बाजारपेठेतील सुमारे १७ लाख टनांची मासिक मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसा आहे.

रब्बी हंगाम सुरू असताना व त्यानंतर रब्बीचे उत्पादन गोळा करताना यंदा हवामान कोरडे राहिल्यामुळे साठवणीत कांद्याचे नुकसान कमी करण्यास मदत झाली आहे.

शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात घेतलेला कांदा बाजारात आणल्यामुळे एकीकडे कांद्याची वाढलेली उपलब्धता आणि दुसरीकडे, मौसमी पावसाला सुरुवात झाल्यामुळे हवेतील आर्द्रतेत झालेली वाढ यामुळे साठवणीतील कांद्याचे नुकसान होण्याची शक्यता वाढली आहे. परिणामी कांद्याचे दर स्थिरावत आहेत.

# शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यासाठी अनुदान

सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हा परिषद सेस फंडातून शेतकऱ्यांना पीक संरक्षण औजारे व उपकरणे, ट्रॅक्टर चलित औजारे, कृषी सिंचनासाठी सुधारित औजारे साधने ५० टक्के मर्यादित अनुदानावर डीबीटी तत्त्वावर देण्यात येणार आहेत.

यासाठी शेतकऱ्यांनी ६ ऑगस्ट २०२४ पर्यंत पंचायत समिती स्तरावर अर्ज करण्याचे आवाहन कृषी विकास अधिकारी नंदकुमार पाचकुडवे यांनी केले आहे. या योजनेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अत्यल्पभूधारक व महिला शेतकरी यांना प्राधान्य राहील. दरम्यान, कृषी योजनांचा फायदा घेणाऱ्या इच्छुक शेतकऱ्यांनी स्वतःचा सातबारा, आठ अ, आधारकार्ड, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची झेरॉक्स प्रत, तसेच लाभार्थी अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे असल्यास जातीचे प्रमाणपत्र व दिव्यांग लाभार्थीसाठी दिव्यांगत्वाच्या दाखल्याची झेरॉक्स प्रतीसह संबंधित पंचायत समितीकडे अर्ज करावेत.

लाभार्थ्यांची निवड केल्यानंतर शेतकऱ्यांनी एक महिन्याच्या आत खुल्या बाजारातून अधिकृत विक्रेत्याकडून आपल्या पसंतीची अवजारे खरेदी करावी लागतील.

खरेदी करावयाची अवजारे अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी परीक्षण करून ती बीआयएस अथवा अन्य संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार, तांत्रिक निकषानुसार असावीत, असेही जिल्हा परिषदेने शेतकऱ्यांना आवाहन करताना कळविले आहे.

जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून शेतकऱ्यांसाठी पिस्टन स्प्रे पंप, नॅपसॅक बॅटरी ऑपरेटेड स्प्रेपंप, ब्रश कटर, सोलार इन्सेक्ट ट्रॅप. रोटाव्हेटर, पल्टी नांगर, रोटरी टिलर व विडर, पेरणी यंत्र, कल्टी व्हेटर, ५ एच पी सबमर्सिबल पंपसंच, डिझेल इंजिन, कडबाकुट्टी, ताडपत्री, स्लरी इत्यादी साधने ५० टक्के मर्यादित अनुदानावर डीबीटी तत्त्वावर देण्यात येणार आहेत.

### पाच ऑगस्टपर्यंत अर्ज करण्याची संधी

औजारांसाठी जास्त अर्ज प्राप्त झाल्यास लक्ष्यांकानुसार सोडत पद्धतीने लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल. मंजूर औजारांचे अनुदान संबंधित शेतकऱ्यांच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यावर डीबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत संबंधित पंचायत समिती कार्यालयाकडे परिपूर्ण कागदपत्रांसह अर्ज करावेत, असे आवाहन कृषी विकास अधिकारी यांनी केले आहे.




## नाफेड घोटाळाप्रकरणी

# अधिकाऱ्यांची उचलबांगडी

नाशिक/प्रतिनिधी

नाफेड कांदा खरेदीमध्ये मोठी कारवाई सध्या करण्यात आली आहे. नाफेडच्या कांदा विभागाच्या केंद्रीय प्रमुखांची आता उचल बांगडी करण्यात आली असून खरेदी देखील थांबविण्यात आली आहे. तसेच पुढील दोन दिवसांत नव्याने कार्यकारिणी नेमून कांदा खरेदी सुरू करण्यात येईल, असेही सांगण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून केंद्रीय मंत्रालयातील समिती ही नाशिक दौऱ्यावर होती. या दौऱ्याअंतर्गत नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून सुरू असलेल्या कांदा खरेदीत गैरव्यवहार असल्याचं समोर आलं होतं. यासाठी या केंद्रीय समितीने नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून ज्या ठिकाणी खरेदी सुरू आहे, अशा ठिकाणी भेटी दिल्या. त्या सगळ्या घडामोडीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. या दोन अधिकाऱ्यांचा समावेश असल्याचे समजते आहे. तर याबाबत महाराष्ट्र शेतकरी कांदा उत्पादक संघटनेचे अध्यक्ष भारत दिघोळे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, याबाबत अद्यापही अधिकृत अशी माहिती मिळाली नाही. मात्र असं काही झालं असेल तर ते शेतकऱ्यांना दाखवण्याकरता आहे. मात्र आम्ही संघटनेच्या माध्यमातून नाफेड कांदा खरेदी घोटाळ्याची ईडी आणि सीबीआयद्वारे चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केलेली आहे. त्याच मागणीचा सारासार विचार करून सरकारने पावले उचलावीत.

### काय नेमका हा घोटाळा

केंद्र सरकारच्या किंमत स्थिरीकरण योजनेअंतर्गत यावर्षी नाफेड आणि एनसीसीएफ या दोन संस्थांमार्फत पाच लाख टन कांदा खरेदी सुरु आहे. या दोन्ही संस्थांकडून प्रत्येकी अडीच लाख टन कांदा खरेदी करण्यासाठी महाराष्ट्रातील काही निवडक फार्मर प्रोड्यूसर कंपन्या व कंपन्यांचे फेडरेशन यांच्यामार्फत कांदा खरेदी सुरू आहे. ही कांदा खरेदी करताना अनेक फेडरेशन व फार्मर प्रोड्यूसर कंपन्यांनी प्रत्यक्षात शेतकऱ्यांचा कांदा न घेता बाजारातून आधीच स्वस्त दरातील कांदा आपल्या गोडाऊनमध्ये साठवून ठेवला. तसेच काही ठराविक व्यापाऱ्यांकडून कमी दरातील कांदा खरेदी करून हाच कांदा सरकारी बफर स्टॉक म्हणून दाखवण्यात आला आहे.

# प्रयोगशील शेतकऱ्याकडून कांदा शेतीत पपईचे आंतरपीक

नाशिक/प्रतिनिधी

कळवण तालुक्यातील जुनी बेज येथील उच्चशिक्षित तरुणाने सेंद्रिय शेतीचा यशस्वी प्रयोग करून दाखवला आहे. आपल्या वडिलोपार्जित पारंपरिक शेतीत जैविक व सेंद्रिय खतांचा वापर करत पपई लागवडीतून लाखो रुपयांचे उत्पादन मिळवले आहे. आतापर्यंत ५६ टन उत्पादन घेतल्यानंतर अजूनही ५६ टन उत्पादन निघण्याची शक्यता या शेतकऱ्याने व्यक्त केली.

प्रयोगशील शेतकरी अमोल पाटील यांनी शेतात प्रथम कांदा लागवड करत आंतरपीक म्हणून पपई या फळबाग पिकाची लागवड केली असून, त्यांनी संपूर्ण जैविक व सेंद्रिय खतांचा वापर करत पपई पिकातून कमी खर्चात भरघोस उत्पादन घेतले आहे. जुनी बेज येथील प्रयोगशील शेतकरी अमोल पाटील यांनी प्रथम दीड एकरमध्ये पंधरा नंबर व्हरायटीची रोपे आणत पपईची लागवड केली. यातून साधारणतः आत्तापर्यंत पाच लाखांचे उत्पादन त्यांना मिळाले आहे. आणखी साडेपाच ते सहा लाख रुपये उत्पन्नाची अपेक्षा आहे. त्यांनी पपईचे क्षेत्र आणखी वाढवले आहे.



दरम्यान पपई लागवडीसाठी त्यांनी बाराशे चाळीस रोपे आणली. लागवडीसाठी त्यांना वीस हजार रुपये खर्च आला, तर खत आणि इतर मशागतीसाठी तीस हजार रुपये, ठिबक सिंचनसाठी चाळीस हजार रुपये, आंतरमशागत पंचवीस हजार रुपये व मजुरीसाठी तीस ते पस्तीस हजार रुपये असा एकूण दीड लाख रुपये एवढा खर्च झाला.

आतापर्यंत यांना ५६ टन उत्पादन मिळाले आहे. अजूनही या पिकातून ५६ टन इतके उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. सरासरी ८ रुपयांपासून ते ३८ ते ४० मिळाला आहे. सध्या ८ ते १० रुपये किलो भाव मिळत असून, हा भावदेखील परवडतो, सांगितले. पपई घेण्यासाठी जम्मू-काश्मीर, दिल्ली, राजस्थान येथून व्यापारी थेट बांधावर येत आहेत. त्यामुळे त्यांचा खर्चदेखील वाचत आहे.

# पेरुच्या सुधारित जाती

नाशिक/प्रतिनिधी

पेरु हे कमी पाण्यावर येणारे कणखर व फायदेशीर पिक आहे. महाराष्ट्रात कमी जास्त प्रमाणात वर्षभर पेरु फळे उपलब्ध असतात. फळांची रुचकर चव, भरपूर प्रमाणात असणारे 'क' जीवनसत्त्व तसेच खनिजद्रव्ये यामुळे पेरु आहे.

पेरुच्या अनेक सुधारीत जाती उपलब्ध आहेत. यापैकी व्यापारीदृष्ट्या सरदार (लखनौ -४९), अलाहाबाद सफेद, ललित, जी-विलास या जातींची मोठ्या प्रमाणात लागवड केली जाते.



**सरदार (लखनौ ४९) :** महाराष्ट्रातील बहुतांशी क्षेत्रावर या जातीची लागवड करण्यात आली आहे. डॉ. चिमा यांनी १९६९ साली प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, गणेशखिंड, पुणे येथे ही जात विकसीत केली आहे. याची झाडे ठेंगणी असून ती आडवी वाढतात. फळे चवीला गोड आहेत. फळांचा गर पांढऱ्या रंगाचा आहे. बयांचे प्रमाण कमी आहे.

**ललीत :** गुलाबी रंगाचा गर व फिक्कट पिवळया रंगाची फळे ही या जातीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. झाडे मध्यम उंचीची असतात. फळांचे सरासरी वजन १८५ ते २०० ग्रॅम आहे. ंबट गोड चवीमुळे खाण्यासाठी व प्रक्रिया उद्योगासाठी उपयोगी आहे.

**वी. एन. आर. बिही :** फळांचा आकार मोठा असून फळांचे वजन ८०० ते १००० ग्रॅम आहे. फळे लवकर पक्व होतात. फळांची टिकवण क्षमता चांगली आहे.

**जी-विलास :** मलिहाबाद, उत्तरप्रदेश या ठिकाणी निवड पध्दतीने ही जात विकसीत करण्यात आली आहे. झाडांचा विस्तार मोठा आहे. झाडे आडवी वाढतात. फळे गोलाकार आहेत. फळांचा रंग फिक्कट हिरवा ते पिवळसर आहे.

# दूध दरासाठी शेतकरी पुत्रांचे सहा दिवसांपासून आमरण उपोषण

## दुधाला ४० रुपये हमीभाव देण्याची मागणी

अहमदनगर/प्रतिनिधी

सध्या राज्यात दूध दराच्या मुद्यावरुन चांगलच वातावरण गरम झाल्याचं वातावरण दिसत आहे. दूध उत्पादक शेतकरी रस्त्यावर उतरुन सरकारचा निषेध करत आहे. दरम्यान, अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील गणोरे गावात शुभम आंबरे आणि संदिप दराडे या तरुणांनी दूध दरासाठी आमरण उपोषण सुरु केलं आहे. या उपोषणाचा सहावा दिवस आहे. दुधाला किमान ४० रुपये हमीभाव मिळावा अशी यांची मागणी आहे. या तरुणांच्या समर्थनासाठी परिसरातील गावे एकवटली आहेत.

दरम्यान, दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. आज गणोरेसह परिसरातील दहा गावांनी कडकडीत बंद पाळला आहे. गणोरे, हिवरगाव, डोंगरगाव, विरगाव, पिंपळगाव, समशेरपूर, देवठाण, वडगाव लांडगा, कळस, गुंजाळवाडी, सावरगाव पाट या गावांनी कडकडीत बंद पाळला आहे.

अहमदनगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर देखील आंदोलन सुरु आहे. खासदार निलेश लंकेच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरु आहे. शेतकरी जन आक्रोश आंदोलनाच्या ठिकाणी दुधाच्या कॅनची हंडी उभारण्यात आली आहे. तसेच त्याला कांद्याच्या माळा देखील लावण्यात आल्या आहेत. आंदोलनाचा आजचा दुसरा दिवस आहे. शेतकऱ्यांचा कांदा आणि दुधाला योग्य भाव मिळावा, या मागणीसाठी खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरु आहे.

# 'रेड वॉटर' सफरचंद उत्पादनाचा यशस्वी प्रयोग

धुळे/प्रतिनिधी

'सफरचंद' म्हंटलं कि आपल्या तोंडाला लगेच पाणी सुटतं. माणसाने एक सफरचंद खाल्लं की त्याला अगदी ताज तवाण वाटत असतं. आजपर्यंत आपण काश्मीरमध्ये पिकणारी सफरचंद खाल्ली असतील. परंतु आता धुळ्याच्या एका प्रयोगशील शेतकऱ्याने रेड वॉटर सफरचंदाची शेती यशस्वीरित्या करून दाखवली आहे. चला तर मग जाणून घेऊ त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास..

जयवंत पाडवी असे या प्रयोगशील शेतकऱ्याचे नाव असून ते धुळे जिल्ह्याच्या शिरपूर तालुक्यातील उर्मदा गावचे रहिवाशी आहेत. एक



प्रयोगशील शेतकरी म्हणून त्यांची आजूबाजूच्या परिसरात ओळख आहे. रेड वॉटर सफरचंदाची लागवड आपल्या शेतात करायची अशी आशा जयवंत पाडवी यांनी मनात बाळगली होती. त्यांनी यूट्यूब, गूगलवरून माहिती घेऊन रेड वॉटर सफरचंदाच्या शेतीचा अभ्यास केला.

हिमाचल प्रदेशमधील शेतकऱ्यांनी जयवंत पाडवी यांना डिसेंबर महिन्यात रेड वॉटर सफरचंदाची लागवड करण्याचा सल्ला दिला होता.

परंतु त्यांनी लोकांनी दिलेले सल्ले बाजूला ठेवत मोठ्या हिंमतीने ऐन उन्हाळयात रोपांची लागवड करण्याचा निर्णय घेतला व त्यांचा तो प्रयोग यशस्वी ठरला.

### एका झाडापासून १० किलोपर्यंत मिळतात सफरचंद

जयवंत पाडवी यांनी रोपांची लागवड केल्यानंतर ११ ते १३ महिन्यांनी रेड वॉटर सफरचंदाच्या झाडांना फळे लागण्यास सुरवात झाली आहे. सध्या १०० ग्रॅम वजनाची सफरचंद झाडांना लागली आहेत अशी माहिती त्यांनी दिली आहे. फळाची गोडी चांगली असून एका झाडापासून ८ ते १० किलो सफरचंद मिळत आहेत.

### पारंपारिक शेतीतून यश मिळत नाही

जयवंत पाडवी हे सुरवातीला पारंपारिक पद्धतीने शेती करत होते. परंतु त्यांना यश मिळत नव्हते व मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत होते. त्यामुळे त्यांनी रेड वॉटर सफरचंदाची शेती करण्याचा निर्णय घेतला. हे सफरचंद बाजारात विक्रीसाठी उपलब्ध झाल्यानंतर लाखो रुपयांचा फायदा होईल देखील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. जयवंत पाडवी यांच्या प्रयोगाचे परिसरातील शेतकरी कौतुक करत आहेत.